// स्त्रीशक्तिरतुल्या सदा //

महाराष्ट्र शासन
GOVERNMENT OF MAHARASHTRA
महाराष्ट्र राज्य महिला आयोग
**Maharashtra State Commission For Women**

गृहनिर्माण भवन (म्हाडा बिल्डिंग)
पोटमाळा, कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.
Tel. : 022-2659 0474 / 2659 1142
Website : www.mscw.org.in

Gruha Nirman Bhavan (MHADA Bldg.)
Mezzanine Floor, Kalanagar, Bandra (E.), Mumbai 400 051.
Fax : 022-2659 1541, Helpline No. 74777 22424
E-mail : mscwmahilaayog@gmail.com

क्रमांक : ममआ-२०१९/सैन-प्रिध-/का-०७/१२।
दिनांक :- ०६.०५.२०१९.

प्रति,
पोलीस अधिक्षक,
पोलीस अधिक्षक यांचे कार्यालय,
जिल्हा-अहमदनगर.

विषय :- 'नगरमध्ये सैराट - आंतरजातीय विवाह केल्यामुळे मुलगी-जावयाला पेटवले' या मथळयाखाली दैनिक लोकसत्तामध्ये प्रसिध्द बातमीबाबत.

माननीय महोदय,

महाराष्ट्र राज्य महिला आयोग अधिनियम, १९९३ अंतर्गत कलम १० (१) (फ) (एक) व (दोन) नुसार महाराष्ट्र राज्य महिला आयोगास स्त्रियांशी निगडित प्रकरणे स्विकारणे आणि त्या बाबींची स्वाधिकारे दखल घेण्याचे अधिकार प्राप्त करण्यात आले आहेत.

'अहमदनगरमध्ये सैराट - आंतरजातीय विवाह केल्यामुळे मुलगी-जावयाला पेटवले' या मथळयाखाली दैनिक लोकसत्तामध्ये प्रसिध्द बातमीची आयोगाने दखल घेतली असून, या प्रकरणी आपल्याकडून कोणती कारवाई करण्यात आली आहे. तसेच सदर कृत्य हे गंभीर स्वरुपाचे असून, समाजात दहशत निर्माण करणारे आहे. सदर वृत्ताची आयोगाने गंभीर दखल घेतली असून, या प्रकरणी तातडीने कारवाई होणे गरजेचे आहे.

तरी प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता आपण व्यक्तीशः लक्ष घालून योग्य ती उचित कार्यवाही करावी, असे निर्देश मा.अध्यक्षांनी दिलेले आहेत. यास्तव आपणाकडून करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल महाराष्ट्र राज्य महिला आयोग कायदा १९९३ कलम १२(२) व (३) नुसार त्वरित पाठवावा, ही विनंती.

मा.अध्यक्षांच्या निर्देशाने सादर,

आपली,

(डॉ.मंजूषा सुभाष मोळवणे)
सदस्य सचिव (अ.का.)

सोबत- वृत्तपत्राचे कात्रण